24 OCT 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबई विद्यापीठाची जबाबदारी आव्हानात्मक

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : 'पुण्यनगरी' कार्यालयास सदिच्छा भेट

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मुंबई विद्यापीठातील परीक्षांचे निकाल लागणे बाकी होते. अशा वेळी तेथे प्रभारी कुलगुरू म्हणून जबाबदारी स्वीकारणे हे आव्हानात्मक होते. मी त्या विद्यापीठाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर तातडीने उचललेल्या पावलांमुळे सर्व परीक्षांचे निकाल आता लागले आहेत. तेथील परीक्षा विभागाला शिस्त लागली आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आणि मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. त्यांनी सोमवारी दै. 'पुण्यनगरी'च्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली, यावेळी ते बोलत होते. संपादक अशोक घोरपडे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, मुंबई विद्यापीठाच्या बहुसंख्य अभ्यासक्रमांचे निकाल रखडले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकही संतप्त झाले होते. विविध पक्ष आणि संघटनांची आंदोलने चालू होती. अशा परिस्थितीमध्ये राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांनी मुंबई विद्यापीठाची जबाबदारी माझ्यावर सोपवली. शिवाजी विद्यापीठाची घोडदौड आणि पुणे विद्यापीठाचा अल्पकाळ प्रभारी कारभार माझ्याकडे असताना घेतलेल्या निर्णयांमुळे कुलपतींनी हा विश्वास दाखवला होता. मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांची जी अवस्था झाली, तशी होणे हे दुर्दैवाचे होते. त्यामुळे त्या परिस्थितीतून विद्यापीठाला बाहेर काढून त्याची प्रतिमा सुधारण्याचे मोठे आव्हान समोर होते.

मुंबई विद्यापीठाचा आवाका मोठा आहे. राज्याच्या राजधानीतील हे विद्यापीठ राज्याचे एक टोक असलेल्या बांद्यापर्यंत पसरले आहे. एक हजार महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न आहेत. जगभरातील विद्यार्थी विद्यापीठात शिक्षण घेतात, त्यामुळे जगाचे लक्ष या विद्यापीठाकडे असते. मुंबई विद्यापीठातील अनुभव हा आयुष्यभर पुरणारा आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी दै. 'पुण्यनगरी'च्या मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी संपादक अशोक घोरपडे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. सोबत मुख्य प्रतिनिधी सुखदेव गिरी.**
**(छाया : एस. अली)**

या गडबडीच्या काळात माझ्या संशोधनाच्या कामाकडेही लक्ष देतो. जगातील एकूण २२ संशोधन पत्रिकांचा मी संपादक आहे. या सर्वांचे काम नियमित करावे लागते. दिवसातील किमान दोन तास संशोधनाच्या कामासाठी देतो. शिवपावन पदभ्रमंती हा शिवाजी विद्यापीठाने नव्याने सुरू केलेला उपक्रम आहे. मी त्यामध्ये सहभागी झालो हे अभिमानास्पद आहे. पन्हाळा ते पावनखिंड या मार्गावरून चालताना छत्रपती शिवाजी महाराज प्रत्येकाला ऊर्जा देतात.

### सर्व निवडणुका एकाच वेळी

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठ कक्षेतील विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका होत आहेत. यामध्ये अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळांचा समावेश आहे. राज्यातील इतर विद्यापीठांनी या निवडणुका वेगवेगळ्या दिवशी घेण्याचे नियोजन केले आहे; मात्र शिवाजी विद्यापीठाने या सर्व निवडणुका एकाच दिवशी घेण्याचे नियोजन केले आहे, त्यावरून विद्यापीठाच्या प्रशासनाची कार्यतत्परता दिसून येते.

### पीएच.डी.चा दर्जा सुधारणे आवश्यक

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, देशभरातून संशोधक विद्यार्थी विद्यापीठात पीएच.डी. करत असतात; मात्र त्यासाठी प्रत्येक प्रदेशात वेगवेगळी पद्धत अवलंबली जाते. देशाच्या उत्तर भागात एक वर्ष कालावधीच्या आतच पीएच.डी. पूर्ण केली जाते. त्यामुळे त्याचा दर्जा घसरतो. किमान तीन वर्षे विद्यार्थ्याने स्वतः योग्य विषयाची निवड करून संशोधन केले पाहजे, तरच पीएच.डी.चा दर्जा सुधारणार आहे.

24 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभेसाठी ३१ पर्यंत अर्ज

## अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळाच्या निवडणुकीच्या हालचाली

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या सदस्यत्वासाठी १७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीची सूचना जाहीर करण्यात आली. यामध्ये अधिसभा, विद्यापरिषद आणि अभ्यासमंडळांचा समावेश आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी, आणि दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निडणुकीद्वारे निवडण्यात येणार आहेत. यामधील राखीव जागांच्या आरक्षणाबाबतचा तपशील निवडणूक सूचनेमध्ये देण्यात आला आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर असून ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघारीची मुदत आहे.

विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेतून दोन शिक्षक निवडून द्यावयाचे आहेत. त्यापैकी प्रत्येकी एक शिक्षक राखीव प्रवर्गातून निवडून देणे आवश्यक आहे. आठ शिक्षकांमध्ये एक महिला शिक्षकाचा समावेश असेल. विद्यापीठातील एकूण चार विद्याशाखांतर्गत ४५ अभ्यास मंडळे आहेत. यातील प्रत्येक अभ्यास मंडळासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड केली जाणार आहे.

### सवता सुभा लक्ष वेधणार

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, विवेकानंद शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद हे शिवाजी विद्यापीठ अधिसभेच्या निवडणुकीतील महत्त्वाचे घटक मानले जातात. गेल्या निवडणुकीत विकास आघाडी आणि अभाविप एकत्र होते, तर विवेकानंद-रयत आणि सुटा अशी आघाडी होती. विद्यापीठ विकास आघाडी, विवेकानंद आणि रयत या मोठ्या शिक्षण संस्था एकत्र आल्या आहेत.

या संघटनांनी 'सुटा'ला अलिप्त ठेवल्याचा मुद्दा चर्चेत आला आहे. संस्थागटातील दहा जागांसाठी 'सुटा'च्या मोर्चेबांधणीकडेही शिवाजी विद्यापीठ वर्तुळात उत्सुकता आहे. सुटा संघटनेत सध्या अंतर्गत कलह सुरू असून त्याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे. विद्यापीठ विकास आघाडी आणि अन्य मोठ्या संस्थांनी जोरदार मोर्चेबांधणी केली असून आगामी निवडणुकीत त्यादृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

### महिलांना संधी

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाच्या अधिकार मंडळांवर विद्यापीठ विद्यार्थी मंडळाच्या सदस्यांना संधी मिळेल. विद्यापीठ विद्यार्थी मंडळाचा अध्यक्ष हा सिनेट आणि व्यवस्थापन परिषदेवर प्रतिनिधित्व करेल. अन्य सदस्यांची इतर मंडळांवर वर्णी लावावी लागणार आहे. दुसरीकडे संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, नोंदणीकृत पदवीधर अशा गटातून किमान प्रत्येकी एका महिलेला संधी देण्याची तरतूद आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या अधिकार मंडळावर महिलांना काम करण्याची संधी मिळेल. हे बदल विचारात घेऊन निवडणुकीला सामोरे जाणाऱ्या आघाड्यांनी तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे.



### प्राचार्य, प्राध्यापकांना पीएचडीची अट

प्राचार्य व प्राध्यापक गटातून पूर्वी अनुक्रमे १८ आणि २० जागा होत्या. आता या दोन्ही गटातील सदस्यसंख्या प्रत्येकी दहा अशी झाली आहे. प्राचार्य गटातून निवडणूक लढविणारा उमेदवार हा पीएचडी असायला पाहिजे किंवा त्यांचा प्राचार्य म्हणून सुमारे १७ वर्षांचा कामकाजाचा अनुभव आवश्यक आहे. प्राध्यापकासाठी पीएचडी अट बंधनकारक आहे. या निकषानुसार प्राध्यापक व प्राचार्य गटाचा किल्ला कोण लढवणार याची रंगतही वाढणार आहे.

### गटनिहाय तयारीला वेग

सिनेटमध्ये पदवीधर, कॉलेज प्राध्यापक, पदव्युत्तर प्राध्यापक, संस्थाचालक अशा गटातून उमेदवार निवडले जाणार आहेत. राज्यातील सत्ताबदल, स्थानिक राजकारणाचे संदर्भ आणि उच्च शैक्षणिक क्षेत्रात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेते मंडळींनी विणलेले शैक्षणिक जाळे या साऱ्या घटकांचा प्रभाव निवडणुकीवर असणार आहे. नोंदणीकृत पदवीधरच्या दहा जागांसाठी तयारीला वेग आला आहे. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्हा हे शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. सिनेट आणि व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, अभ्यास मंडळ या अधिकार मंडळासाठी दर पाच वर्षांनी निवडणूक होते.

जनसंपर्क कक्ष

24 OCT 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अधिकार मंडळ निवडणूक : पहिल्या दिवशी दीडशे अर्जांची विक्री

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या सदस्यत्वासाठी रविवारी सायंकाळी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यानुसार अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळासाठी १७ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठीच्या अर्ज विक्रीला सोमवारपासून सुरूवात झाली. सोमवारी पहिल्याच दिवशी सायंकाळपर्यंत १५० अर्जांची विक्री झाली होती.

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार १७ नोव्हेंबर रोजी मतदान आणि २० नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून या निवडणुकांसाठीची जय्यत तयारी उमेदवारांकडून सुरू होती. अनेकजण निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची प्रतीक्षा करत होते. सोमवारपासून निवडणुकीच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. सोमवारपासून अर्ज विक्रीला प्रारंभ होणार असल्याने सकाळपासूनच अनेकजणांनी अर्ज खरेदीसाठी विद्यापीठाच्या कंझ्युमर्स स्टोअरमध्ये गर्दी केली होती. सायंकाळपर्यंत १५० अर्जांची विक्री करण्यात आली.



महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार या निवडणुका घेण्यात येणार आहेत. या कायद्यातील तरतुदीनुसार अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी, आणि दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निवडण्यात येणार आहेत. विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेतून २ शिक्षक निवडून द्यायचे असून त्यापैकी एक शिक्षक राखीव प्रवर्गातून द्यायचा आहे. तसेच आठ शिक्षकांमध्ये एक महिला शिक्षिका निवडण्यात येणार आहे. प्रत्येक अभ्यासमंडळासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड करण्यात येणार आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघार घेता येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
'24 OCT 2017
Times of India

# Nomination filing begins at SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The filing of nomination for various academic bodies of the Shivaji University, Kolhapur (SUK) started from Monday.

According to the varsity, the last date of nomination is scheduled at October 31, while the voting will take place on November 17 for the respective bodies. In a circular, SUK registrar Vilas Nandavadekar stated that under the Maharashtra Public Universities Act, 2016 various academic bodies will be elected via elections later next month.

"The election notice was issued on October 22 and one can submit nomination till October 31. The scrutiny of the applications will be done till November 2 and the last date to take back nominations will be November 4. The list of all eligible candidates will be published on November 6," the circular read.

According to the registrar, voting will take place on November 17 from 9am to 5pm and the results will be announced on November 20. All details regarding the election program is available on the varsity's website under the University Election 2017 tab.

**According to the varsity, the last date of nomination is scheduled at October 31, while the voting will take place on November 17**

He added that for more information one can visit varsity's web portal www.unishivaji.ac.in.

**ACADEMY BODY ELECTIONS**

Earlier, a circular from the registrar's office said the voters' list has been published on September 15 and the last date to suggest any grievances was set at September 20. The final voters' list has been published on October 12 after a thorough scrutiny.

24 OCT 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**देवानंद शिंदे :** संवाद, विश्वासाच्या जोरावर मुंबई विद्यापीठाच्या निकालाचे आव्हान समर्थपणे पेलले; महिना अखेरपर्यंत पुनर्मूल्यांकन संपविणार

# शिवाजी विद्यापीठाची विश्वासार्हता वाढली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संवाद आणि विश्वासाच्या जोरावर मुंबई विद्यापीठातील निकालाचे आव्हान समर्थपणे पेलले. त्यासाठी शिवाजी विद्यापीठातील अनुभव खूप उपयोगी पडला. मुंबईतील या कामगिरीमुळे शिवाजी विद्यापीठाची विश्वासार्हता वाढली असल्याचे मुंबई विद्यापीठाचे प्रभारी आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी येथे सांगितले.



'लोकमत' शहर कार्यालयाला कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सदिच्छा भेट दिली. 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी 'लोकमत'चे उपव्यवस्थापक (मनुष्यबळ व प्रशासन) संतोष साखरे, मुख्य बातमीदार विश्वास पाटील, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर उपस्थित होते. मुंबई विद्यापीठातील कामगिरी, निकालाची स्थिती, त्याठिकाणी राबविलेली यंत्रणा आदींबाबत कुलगुरु डॉ. शिंदे यांनी यावेळी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, मुंबई विद्यापीठाचे निकाल लावण्याचे काम आव्हानात्मक होते. ज्यावेळी मी तेथील प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारला. त्यावेळी ३०० परीक्षांमधील ५५ हजार विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर झाले होते. त्यानंतर अवघ्या वीस दिवसांत चार लाख विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर केले. यासाठी त्याठिकाणी कार्यरत असलेल्या यंत्रणा वापरली.

लवकर निकाल लावण्यासाठी तेथील अधिकारी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्याशी संवाद, विश्वास या सूत्रावर जोर देत कार्यरत राहिलो. त्याचा सकारात्मक परिणाम झाला. पुणे विद्यापीठापाठोपाठ मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदाची जबाबदारी सांभाळण्याची संधी मिळाल्याने यातून शिवाजी विद्यापीठाचा सन्मान झाला आहे. निकालाच्या मुद्द्यावरून अडचणीत आलेल्या मुंबई विद्यापीठाला सुरुवातीला उत्तरपत्रिका तपासणीसाठी आपल्या विद्यापीठाने मदतीचा हात दिला.

त्यानंतर प्रभारी कुलगुरुपदाची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली. या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर केलेल्या सकारात्मक कामगिरीमुळे शिवाजी विद्यापीठाची राष्ट्रीय, राज्य पातळीवर विश्वासार्हता वाढली आहे.

मुंबई विद्यापीठातील पुनर्मूल्यांकनाचा निकालाचा वेग दिवाळीमुळे मंदावला होता. सुमारे २४ हजार इतके पुनर्मूल्यांकनाचे निकाल जाहीर करावयाचे आहेत. त्यातील आतापर्यंत साधारणतः १२ हजार निकाल जाहीर झाले आहेत. उर्वरित निकालांचे काम या महिनाअखेरपर्यंत संपविण्यात येईल.

## ग्रामीण विद्यापीठांचा विचार व्हावा

देशातील ग्रामीण भागातील विद्यापीठांचे संशोधन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या अनुषंगाने काही चांगले काम सुरु आहे. देशातील वीस विद्यापीठे जागतिक दर्जाची बनविणार असल्याची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे. त्यामध्ये ग्रामीण विद्यापीठांचा विचार व्हावा, अशी अपेक्षा कुलगुरु डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, सध्या देशात राज्यनिहाय, विविध अभ्यासक्रमनिहाय शिक्षणाबाबतचे धोरण आहे. ते बदलून समान धोरण असणे आवश्यक आहे.

## बांधीलकी मोठी

औरंगाबाद, पुणे, मुंबईच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठाबाबतची समाजातील विविध घटकांची मोठी बांधीलकी आहे. त्याची जाणीव मला येथून बाहेर काम करताना झाली असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, ही बांधीलकी विद्यापीठाला मोठे बळ देणारी आहे. त्याच्या जोरावर विद्यापीठाचा विविध क्षेत्रांतील नावलौकीक वाढत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2017
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव उपस्थित होते.

# कुलगुरु देवानंद शिंदे यांची दैनिक 'पुढारी' कार्यालयास भेट

## डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्याशी चर्चा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांची सोमवारी भेट घेतली. यावेळी मुंबई विद्यापीठासह विविध शैक्षणिक प्रश्नांवर डॉ. शिंदे यांनी डॉ. जाधव यांच्याशी चर्चा केली. यावेळी दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडे मुंबई विद्यापीठाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेच्या निकालाचा विषय राज्यभर चर्चेचा बनला होता. निकाल लांबणीवर पडत चालल्याने राज्य सरकारने निकालासाठी डेडलाईन दिली होती. या मुदतीत निकाल लावण्याचे आव्हान डॉ. शिंदे यांच्यापुढे होते. ते आव्हान त्यांनी पेलत मुदतीत निकाल लावले. या पार्श्वभूमीवर डॉ. शिंदे यांनी आज डॉ. जाधव यांची दैनिक 'पुढारी' कार्यालयात भेट घेतली. प्रारंभी 'पुढारी'चे संस्थापक-संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर त्यांनी डॉ. जाधव यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली.

24 OCT 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मटा अँकर **डिजिटायझेशनला देणार गती, परीक्षा प्रक्रियेसाठी ऑनलाइन यंत्रणा करणार सक्षम**

# टेक्नोसॅव्हीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे नवे पाऊल

**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : @anuradhakadamMT

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार आकडेवारीसह सविस्तर माहिती ऑनलाइन देणाऱ्या देशभरातील विद्यापीठांत पहिल्या पाच विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाने यापूर्वीच स्थान मिळवले आहे. प्रशासकीय कामकाजाच्या गतीसाठी डिजिटल यंत्रणा कार्यान्वित केली आहे. याच टेक्नोसॅव्ही कामकाजाच्या पंक्तीत आता विद्यापीठ ऑनलाइन परीक्षा पद्धतीचा समावेश करत नव्या वर्षात डिजिटल पाऊल टाकणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'शी विशेष संवाद साधताना ही माहिती दिली. तसेच भविष्यात ऑनलाइन यंत्रणा अधिक सक्षम करून विद्यापीठ प्रशासन आणि विद्यार्थी यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठांच्या परीक्षांचे नियोजन आणि योग्य कालावधीत निकाल जाहीर करण्याचे आव्हान विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत सातत्याने पेलले आहे. परीक्षेनंतर चाळीस दिवसांच्या कालावधीत निकाल जाहीर करण्यासाठी विद्यापीठाची परीक्षा विभाग यंत्रणा काम करते. दरम्यान, शालेय व महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासक्रमांचे बदलते स्वरूप आणि उत्तीर्ण होण्याचा वाढता टक्का लक्षात घेता पदव्युत्तर शिक्षणाकडेही विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे. तसेच संशोधनामध्ये स्वारस्य असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठातील विविध आंतरराष्ट्रीय संस्था व विद्यापीठांसोबत झालेल्या सामंजस्य करारांचाही फायदा होत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने राज्यातील विद्यापीठांच्या यादीत विश्वासार्ह स्थान मिळवले आहे.

### भविष्यातील वाढती ऑनलाइन मानसिकता

आणि नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना उपलब्ध होत असलेल्या संधी यामुळे परीक्षा पद्धतीलाही ऑनलाइन टच देण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा विचार असल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी अधोरेखित केले. सध्या विद्यापीठात ऑनलाइन मूल्यांकन पद्धती कार्यान्वित आहे. उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करणाऱ्या प्राध्यापकांनी ऑनलाइन रजिस्ट्रेशन केल्यानंतर त्यांना मिळणारा ओटीपी क्रमांक आणि त्यानंतर ऑनस्क्रिन मार्किंग सिस्टिमचे हक्क अशी ही प्रणाली आहे. सध्या विद्यापीठात काही विद्याशाखांच्या प्रवेश परीक्षा ऑनलाइन घेण्यात येतात. मात्र सर्व शाखांची ऑनलाइन परीक्षा घ्यायची झाल्यास त्याची सॉफ्टवेअर यंत्रणा, सक्षम सर्व्हर यासंदर्भातील त्रुटी दूर करण्यासाठीचे नियोजन लवकरच सुरू करण्यात येणार आहे.



## प्रश्नपत्रिका नमुना ऑनलाइन

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना पाठवण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीवर होणारा खर्च आणि वेळेचा अपव्यय टाळण्यासाठीही ऑनलाइन प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. प्रश्नपत्रिका संच महाविद्यालयांकडे पाठवण्यापेक्षा प्रश्नपत्रिकेचा नमुना ऑनलाइन पाठवून महाविद्यालयातच प्रश्नपत्रिकांच्या प्रती छापून त्या वितरीत करण्याबाबत विचार सुरू आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या निधीतून महाविद्यालयांना प्रिंटर देण्यात येणार आहेत.

## काय करू नये याचा वस्तुपाठ



मुंबई विद्यापीठाची हंगामी जबाबदारी स्वीकारल्यानंतर प्रलंबित निकाल जाहीर करण्याचे आव्हान होते. कालबाह्य सॉफ्टवेअर यंत्रणा वापरणाऱ्या मुंबई विद्यापीठासाठी ही जबाबदारी पार पाडताना परीक्षा प्रक्रिया आणि निकाल यंत्रणा यांचा मेळ साधताना काय करू नये, याचा वस्तुपाठ मिळाला. शिवाजी विद्यापीठातील आगामी ऑनलाइन परीक्षा यंत्रणेबाबत नियोजन करताना मुंबई विद्यापीठात आढळलेल्या त्रुटींचाही विचार करता येईल, असे डॉ. शिंदे यांनी आवर्जून सांगितले.



24 OCT 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबई विद्यापीठाचे 'प्रभारी' हा सन्मान

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : 'सकाळ' कार्यालयाला सदिच्छा भेट

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरुपद मिळणे, हा शिवाजी विद्यापीठाचा सन्मान आहे, अशी भावना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे व्यक्त केली. मुंबई विद्यापीठाचा निकाल लावण्यासाठी विद्यापीठातील कामकाजाचा अनुभव उपयोगी पडल्याचेही त्यांनी सांगितले. 'सकाळ' कार्यालयाला त्यांनी आज सदिच्छा भेट दिली. त्या वेळी ते बोलत होते. सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी कार्यकारी संपादक मनोज साळुंखे उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, "महाविद्यालयांना ऑनलाईन प्रश्नपत्रिका पाठविण्याचा प्रयोग यशस्वी ठरला असून, विद्यार्थी परीक्षा केंद्रावर उपस्थित आहे, की नाही, याची माहिती एसएमएसद्वारे विद्यार्थी व पालकांना देण्याचा प्रयोग यंदा काही केंद्रांवरून केला आहे. परीक्षेला हजर असणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी घेऊन त्यांना तसे एसएमएस पाठविले. निकाल लागल्यानंतर काही विद्यार्थी एखाद्या परीक्षेला हजर असल्याचे सांगतात; मात्र वस्तुस्थिती तशी असतेच असे नाही."

ते म्हणाले, "मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची संख्या सातशेवर आहे. तेथील कामाचा व्याप मोठा आहे. शिवाजी विद्यापीठातील कामाचा अनुभव पाठीशी असल्याने समस्यांची सोडवणूक करण्यात वेळ लागत नाही. मुंबई विद्यापीठाचा रखडलेला निकाल लावण्यासाठी प्राध्यापक वर्गाने केलेले सहकार्य महत्त्वपूर्ण ठरले. भविष्यात असेच सहकार्य अपेक्षित असून, विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी विविध घटक नक्कीच मदत करतील, असा विश्वास आहे."



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सकाळ कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार व कार्यकारी संपादक मनोज साळुंखे यांच्याशी चर्चा करताना कुलगुरू डॉ. शिंदे.** (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

> **विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी यांच्या सहकार्यातून विद्यापीठाचा कारभार उत्तम सुरू आहे. नवनवे बदल आत्मसात करत विद्यापीठाला दिशा दिली जात आहे.**
>
> **-डॉ. देवानंद शिंदे,**
> शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू.

जनसंपर्क कक्ष
24 OCT 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रीकोरोमन कुस्तीचा शिवाजी विद्यापीठाचा निर्णय

फिरोज मुलाणी
औंध

कुस्तीची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात अनेक दिवसांपासून मागणी होत असलेल्या ग्रीकोरोमन कुस्तीला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्रकुलगुरू डॉ. डी. सी. शिर्के यांच्याकडून हिरवा कंदील मिळाला आहे. त्यामुळे ग्रीकोरोमन कुस्ती प्रकारासाठी विद्यापीठाचा संघ पुढे जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्याला फार पूर्वीपासून कुस्तीची परंपरा व इतिहास आहे. त्याला छ. शाहू महाराजांनी पाठबळ देऊन अनेक मल्ल राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे घडवले. शेकडो वर्षांची परंपरा असणाऱ्या कुस्ती खेळातील ग्रीकोरोमन प्रकार कुस्तीचा राष्ट्रीय स्तरावर समावेश असावा. यासाठी सातत्याने शारीरिक शिक्षक क्रीडा संचालकांनी कुलगुरू यांच्यांकडे केली होती. कुलगुरूंनी घेतलेला निर्णय हा विद्यापीठातील सर्व शारीरिक शिक्षक कुस्तीगीर व पालकांना लाभदायक ठरणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धा

**कोल्हापूर :** कुरुंदवाड येथील एस. के. पाटील महाविद्यालयात गुरुवारी (२६ ऑक्टोबर) शिवाजी विद्यापीठ वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धा होणार आहे. इच्छुक खेळाडू व विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन 'भारत श्री' बिभिषण पाटील व प्रा. प्रशांत पाटील यांनी केले आहे.